# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

**5**


**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर



Harbour Press®
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना (दिवा पाहूनी लक्ष्मी येते) | ३ |
| २. | लोभाचा दुष्परिणाम | ४ |
| ३. | सूर्य आणि वारा | ५ |
| ४. | हसा मुलांनो हसा | ६ |
| ५. | ज्योतीराव फुले | ७ |
| ६. | पाणी व मनुष्यजीवन | ८ |
| ७. | पाऊस आला रे | १० |
| ८. | स्वामी विवेकानंद | ११ |
| ९. | आईला मदत करूया! | १२ |
| १०. | झाड बोलतेय | १३ |
| ११. | सांग ना आई! | १४ |
| १२. | एक वेगळीच युक्ती | १५ |
| १३. | गुढीपाडवा | १७ |
| १४. | मौन | १८ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराज | १९ |

# १ प्रार्थना ( दिवा पाहूनी लक्ष्मी येते )

✦ **काव्य परिचय**

- घरात लक्ष्मी येण्याची वेळ ही साधारणत: संध्याकाळची मानली जाते. त्यामुळे दिवा पाहून घरात लक्ष्मी येते असे मानले जाते; म्हणून संध्याकाळीही दिवा लावून प्रार्थना म्हणण्याची प्रथा आहे.
- **शुभं करोती कल्याणम्** असे म्हणा त्यामुळे सर्व काही शुभ होईल असे मुलांना सांगणे.
- जिथे ज्योत आहे तिथे लक्ष्मी वसते. ह्या जगाच्या सेवेसाठी ती नेहमीच तयार असते. सर्व दिशेतून या लक्ष्मीच्या पाऊलखुणा दिसत आहे म्हणजेच तिचे अस्तित्व जाणवत आहे.
- देवीच्या आगमनाने कोणतेही कठीण संकट दूर होतील. चांगल्या आरोग्यासह धन-संपत्तीही मिळते. शत्रुबुद्धी म्हणजेच वाईट विचार मनात येत नाहीत आणि त्यामुळे जीवनात सुख-समाधान लाभते.
- दिवा लावण्याची ही प्रथा जुनी आहे हे समजावताना मुलांना जुन्या पद्धतीची ओळख करून देणे.

✦ **उद्देश**

- प्रार्थना म्हणजे काय? प्रार्थनेचे प्रत्येकाच्या मनातील स्थान समजावून सांगणे.
- प्रार्थनेचा मूळभाव विद्यार्थ्यांना समजावणे.
- विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी रुची वाढविणे.

✦ **अध्यापन कृती**

विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारावेत.

**उदाहरण-**

१. तुमची आजी किंवा आई संध्याकाळी तुळशीजवळ दिवा लावते का?

२. तुम्ही देवासमोर संध्याकाळी प्रार्थना म्हणता का?

- अशा प्रश्नातून विद्यार्थ्यांच्या मनातील प्रार्थनेची संकल्पना जाणून घेणे.
- त्यानंतर पुस्तकातील प्रार्थनेची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना **दिवा पाहूनी लक्ष्मी येते**.... ही प्रार्थना पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचा १०-१० चा गट करून प्रार्थना म्हणण्यास सांगणे.
- प्रत्येक विद्यार्थी आपल्या गटात प्रार्थना म्हणतील.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. कवीने लक्ष्मीची प्रार्थना करण्यास सांगितले आहे.

२. कवी शुभं करोती ही प्रार्थना म्हणण्यास सांगत आहे.

३. जेथे ज्योती असते तेथे लक्ष्मी असते.

४. दिशादिशांतून लक्ष्मीच्या पाऊलखुणा दिसतात.

५. ज्योतीने संकट संपून उत्तम आरोग्य व संपत्ती मिळते तसेच शत्रुबुद्धीचा विनाश होऊन सुख-संपत्ती मिळते.

**प्र २.** १-२ विद्यार्थ्यांना कवितेच्या ओळी पूर्ण करण्यास सांगाव्यात.

**प्र ३.** १. स्वास्थ्य २. वात ३. सुखसंपत्ती ४. वंदन

**प्र ४.** १. अकल्याण २. मित्र ३. अशुभ ४. नवा

## २ लोभाचा दुष्परिणाम

### ✦ पाठ परिचय

- मुंबई रेल्वेस्टेशनवर गाडी उभी असताना त्या गाडीत एक अनोळखी माणूस चढणे व गाडीत एक पेटी ठेवून निघून जाणे.
- अनेक स्टेशन निघून गेले तरी त्या गृहस्थाचे न येणे.
- मुंबईहून निघालेली गाडी चेन्नईला पोहोचणे.
- सगळे प्रवासी उतरून गेले तरीही पेटी तशीच असणे. त्यामुळे एका प्रवाशाचे पेटी घेऊन जाणे.
- सामान घेऊन जाताना एका तिकिटावर इतके सामान म्हणून टि.सी. ने पकडणे व अधिक सामानावर पावती फाडणे.
- त्यानंतर कस्टमवाल्यांकडून पकडले जाणे. पेटीची चावी नसल्याने कुलूप तोडणे. त्यात बॉम्ब व हत्यारे सापडणे.
- सामान त्याचे नसले तरी लोभामुळे तो ह्या खटल्यात अडकणे.
- पाठामार्फत लोभ करू नये ही शिकवण देणे.

### ✦ उद्‌देश

- विद्‌यार्थ्यांना गोष्टीरूपाने लोभ करू नये ही शिकवण देणे.
- विद्‌यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्‌यार्थ्यांना लोभ करू नये या विषयावर आधारित लोभी कुत्रा ही गोष्ट सांगावी.
- विद्‌यार्थ्यांकडून लोभ करू नये हे तात्पर्य काढावे. तसेच लोभ केल्याने नुकसान होते हे विद्‌यार्थ्यांना समजावणे.
- शिक्षकांनी पाठ शिकविण्यापूर्वी पाठातील कथा गोष्टीरूपाने सांगावी.
- पाठाचा अर्थ विद्‌यार्थ्यांकडून विचारत पाठ समजावून सांगावा.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. अनोळखी माणसाने गाडीत पेटी ठेवली.

२. मुंबईहून निघालेली गाडी चेन्नईला पोहोचली.

३. प्रवाशाला पेटी घेऊन जाताना टि.सी. ने पकडले.

४. बेवारस वस्तू दिसल्यास पोलिसांच्या निदर्शनास आणावी.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र २.** | १. | बॉम्ब व हत्यारे | २. | महाशय | ३. | मोह | | |
| **प्र ३.** | १. | सफर | २. | नित्य | ३. | अंत | | |
| | ४. | मानव | ५. | जागरूक | | | | |
| **प्र ४.** | १. | दुर्लक्ष | २. | आत | ३. | सापडणे | ४. | खोटा |
| **प्र ५.** | १. | गाड्या | २. | पेट्या | ३. | तिकीट | | |
| | ४. | खटला | ५. | हत्यारे | | | | |

# ३ सूर्य आणि वारा

## ✦ पाठ परिचय

- सूर्य आणि वारा यात श्रेष्ठ कोण? असा वाद निर्माण होणे.
- दोघात कृती करून स्वत:चे मोठेपण दाखवण्याचे ठरले.
- वाटसरूच्या अंगावरची घोंगडी काढण्याचे ठरले.
- वाऱ्याने आपला वाहण्याचा वेग वाढवणे. वाटसरूचे घोंगडी डोक्यावरून लपेटणे. शेवटी वाऱ्याचे दमून जाणे.
- सूर्याची कोवळी किरणे वाटसरूच्या दिशेने फेकणे व हळूहळू अधिक प्रखरता वाढणे.
- त्यामुळे वाटसरूने आपली घोंगडी सैल करणे व जास्त उकडू लागल्यावर घोंगडी बाजूला काढून दूर ठेवणे.
- वाऱ्याने आपला पराभव मान्य करणे.

## ✦ उद्देश

- कोणत्याही गोष्टीचा कधीही गर्व करू नये.
- प्रत्येकात काहीना काही विशेष गुण असतात हे विद्यार्थ्यांना ज्ञात करून देणे.
- श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेदभाव करू नये.
- वेगवेगळ्या विषयातून/गोष्टीतून मराठी विषयाची आवड निर्माण होणे.

## ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना गर्व करू नये या विषयास अनुसरून त्यांना ज्ञात असलेली गोष्ट किंवा उदाहरणे सांगण्यास प्रवृत्त करावे.
- त्यानंतर पाठ गोष्टीरूपाने सांगावा.
- गर्व न करता प्रत्येकाच्या गुणांचा आदर करावा हे समजावून देणे.
- आपल्याकडून चूक झाल्यास मान्य करावी अशा वेगवेगळ्या उदाहरणातून पाठ समजावून द्यावा.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. वाटसरूच्या खांद्यावर घोंगडी होती.
२. एकापेक्षा एक श्रेष्ठ असा वाद सूर्य आणि वारा या दोघात निर्माण झाला.
३. वाटसरूच्या अंगावर कोवळी किरणे सूर्याने फेकली.
४. वारा आणि सूर्य या दोघात वाऱ्याने पराभव मान्य केला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्र २.** | १. वाटसरूला | २. घामाच्या | ३. घोंगडी | |
| | ४. डोक्यावरून | ५. ऊब | | |
| **प्र ३.** | १. वायू | २. रवी | ३. महान | ४. पराजय |
| **प्र ४.** | १. गरमी | २. कनिष्ठ | ३. सौम्य | ४. लहान |
| **प्र ५.** | १. चूक | २. बरोबर | ३. बरोबर | ४. बरोबर |

## ✦ हसत-खेळत

**प्र ६.** वर्गात विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना वाक्ये लिहिण्यास सांगणे.

## ४ हसा मुलांनो हसा

### ✦ काव्य परिचय

- कवयित्री लहान मुलांना सांगत आहे, मुलांनो, तुम्ही प्रकाशातले तारे आहात. तुम्ही अंधारावर नाराज व्हा.
- मुलांनो, तुम्हाला आपल्या यशाच्या गाथा म्हणजेच थोर व्यक्तींच्या यशाच्या गाथा बोलवीत आहेत. त्यामुळे तुमच्या मनातील अज्ञान, हिंसेची भावना मागे ठेवा. विज्ञानयुगात माणुसकीचे व्रत घ्या आणि ते हसत-हसत पाळा.
- हरणे हा आपला स्वभाव धर्म नाही. जिंकण्यासाठी आपण जन्म घेतला आहे. आजच्या या आतंकी राक्षसाच्या जाळ्यातून तुला सर्वांना मुक्त करायचे आहे. (जीवंत उदाहरणांचा परिचय)
- एकमेकांत जी दुश्मनी असते ती विसरून एकतेची शपथ घ्या, मग हा आपला भारत देश समृद्ध होईल.

### ✦ उद्देश

- कर्तव्याची भावना जागृत होऊन यशाच्या मार्गाने वाटचाल करता येणे.
- देशप्रेमाची जाणीव होणे.
- सर्वधर्म समभावाची माहिती होऊन समृद्ध देशाचे स्वप्न साकारता येणे.
- हसत-हसत प्रत्येक संकटांचा हिंमतीने सामना करणे ही शिकवण देणे.

### ✦ अध्यापन कृती

- ऐतिहासिक, विज्ञानयुगातील अशा वेगवेगळ्या उदाहरणांच्या साहाय्याने कवितेचा अर्थ समजावून द्यावा.
- कठीण शब्दांचे अर्थ विचारून तसेच समजावून आशय स्पष्ट करताना सोप्या व दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा आधार घ्यावा.
- विद्यार्थ्यांना प्रथम कविता चालीवर म्हणून दाखवावी. त्यानंतर कविता विद्यार्थ्यांकडून सामूहिकरित्या म्हणून घ्यावी.

### ✦ सामूहिक कार्य

- विद्यार्थ्यांचे गट करावेत. एक विद्यार्थी म्हणूनही आपले देशासाठी काही कर्तव्य असतात ती विचारावीत-

  १. आपला देश समृद्ध होण्यासाठी तुम्ही काय कराल?

  २. देशप्रेम म्हणजे काय? यासारखे प्रश्न गटात देऊन विद्यार्थ्यांना त्यावर आपले मत मांडण्यास सांगावे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. कवितेत प्रकाशातले तारे हे मुलांना म्हटले आहे.

२. विज्ञानयुगात मुलांना माणुसकीचा वसा घेण्यास सांगितले आहे.

३. आपण जन्म जिंकण्यासाठी घेतला असे कवयित्री म्हणते.

४. एकतेची शपथ घेतल्यावर आपला भारतदेश समृद्ध होईल.

**प्र २.** १. हरणे हा ना धर्म आपुला

जिंकण्यासाठी जन्म घेतला
आतंकीच्या जाळ्यातून तू
नष्ट कर त्या राक्षसा ........

२. विसरू आपण सर्व दुश्मनी
शपथ एकतेची घेऊ मनी
बघ हा भारत देश
समृद्ध होईल कसा.....

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | चूक | २. | बरोबर | ३. | बरोबर | ४. | चूक |
| **प्र ४.** | १. | मुले | २. | वसा | ३. | भारत | ४. | शपथ |
| **प्र ५.** | १. | दानव | २. | चांदण्या | ३. | मानवता | ४. | वचन |
| **प्र ६.** | १. | अहिंसा | २. | ज्ञान | ३. | जिंकणे | | |
| | ४. | मृत्यू | ५. | अपयश | ६. | अधर्म | | |

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** १. माणुसकी- प्रत्येक माणसाने **माणुसकी** जपली पाहिजे.
२. शपथ- मी आज **शपथ** घेतली की नेहमी चांगलेच काम करीन.
३. राक्षस- आजीने आज मला **राक्षसाची** गोष्ट सांगितली.
४. जाळे- कोळी नदीत **जाळे** टाकून मासे पकडतो.

## ५ ज्योतीराव फुले

✦ **पाठ परिचय**

- महात्मा ज्योतीराव फुले यांनी मुलींसाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा करून दिला व त्यामुळेच प्रत्येक क्षेत्रात आज मुली अग्रेसर आहेत त्यांच्या या कार्याची ओळख.
- देशात आपल्या गुणांनी व कार्यांनी नाव कमावलेल्या महिलांची ओळख व त्यासाठी ज्योतीराव व सावित्रीबाईंनी केलेले प्रयत्न.
- महात्मा ज्योतीराव फुले आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख.

✦ **उद्‌देश**

- विद्‌यार्थ्यांना ज्योतीराव व सावित्रीबाई यांच्या कार्याविषयीची माहिती मिळवून देणे.
- स्त्रीशिक्षणाचे महत्त्व.
- छोट्‌या-छोट्‌या गोष्टीतून समाजकार्य कसे करू शकतो ते समजावणे.
- कोणत्याही अडचणींना खंबीरपणे सामोरे जात धैर्य साध्य करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी प्रथम विद्‌यार्थ्यांकडून सावित्रीबाई फुले व ज्योतीराव फुले यांच्याविषयी ज्ञात माहिती जाणून घ्यावी.
- समाजातील स्त्रीशिक्षणाचे महत्त्व जाणून त्यांनी केलेल्या कार्याची ओळख व ते कार्य करताना येणाऱ्या अडचणी समजावून द्‌याव्यात.
- ज्योतीरावांच्या या महान कार्यामुळे आज प्रत्येक क्षेत्रात कार्य करणाऱ्या उच्च पदावरील

स्त्रियांची नावे विचारावीत.

- कोणतेही चांगले काम करताना येणाऱ्या अडचणींना सामोरे जात ते कार्य, उद्दिष्ट कसे साध्य करावे हे समजावून द्यावे.
- तसेच त्या कामामुळे दूरगामी काय फायदे होतात?
हे समजावून सांगावे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. महात्मा ज्योतीराव फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

२. शिक्षणापासून दूर अंधारात राहणाऱ्या मुलींना (महिलांना) उजेडाचा मार्ग सापडला.

३. वरील उताऱ्यात सावित्रीबाई फुले, किरण बेदी, कल्पना चावला, अंजली भागवत, पी.टी. उषा, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील इत्यादी महिलांची नावे आली आहेत.

४. महात्मा ज्योतीराव फुले यांना स्त्री शिक्षणकार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी मदत केली.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **प्र २.** | १. | शाळा | २. | स्त्री | ३. | अंधार |
| **प्र ३.** | १. | अंधार | २. | दूर/लांब | ३. | अनेक |
| **प्र ४.** | १. | पुरुष | २. | मुलगे | ३. | शिक्षक |

✦ **हसत-खेळत**

१. सुशिक्षित होण्याकरता, शाळेत जावे शिकण्याकरता.

२. स्वाभिमान जागृत करून सन्मानाने जगवते ते शिक्षण.

३. आमचा भारत साक्षर असो; साक्षर भारत संपन्न असो.

४. शिक्षणाने मनुष्य साक्षर होतो व अनुभवाने तो
शहाणा होतो.

## ६ पाणी व मनुष्यजीवन

✦ **पाठ परिचय**

- पाण्याविषयी माहिती.
- पाण्याची आपल्या शरीराला असलेली आवश्यकता.
- प्रत्येक जीवसृष्टींसाठी असलेली पाण्याची आवश्यकता.
- पाण्याचा दुरुपयोग करू नये याविषयी सल्ला.

✦ **उद्देश**

- पाण्याचे मनुष्यजीवनातील व धरतीवरच्या जीवसृष्टीसाठी असलेले महत्त्व समजावून सांगणे.
- मनुष्यजीवनातील पाण्याचे महत्त्व.
- पाण्याचा योग्य वापर व जपवणूकीतून दूरगामी होणारे
फायदे जाणणे.

✦ **अध्यापन कृती**

- पाणी म्हणजे जीवन हे समजावून द्यावे. पृथ्वीचा व शरीराचा बराच भाग पाण्याने भरलेला आहे हे उदाहरणांद्वारे समजावून द्यावे.
- शरीराला पाण्याची कमतरता भासली तर काय होते? ते समजावून सांगावे.

- दिवसभरातून मुले/विद्यार्थी किती पाणी पितात? व किती प्यावे? हे प्रथम विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावे व नंतर त्यांना समजावून सांगावे.
- आपण पाण्याशिवाय जगू शकत नाही. तसेच इतर प्राण्यांच्या जीवनातील पाण्याचे महत्त्व त्यांना स्पष्ट सांगावे. आजकाल पाण्याची झालेली कमकरता व एक विद्यार्थी तसेच देशाचा नागरिक म्हणून पाणी कसे वाचवाल हे त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
- वरील सर्व चर्चेनंतर विद्यार्थ्यांना पाठ समजावून सांगावा.

✦ **उत्तरे**

**प्र १. अ**

१. शरीराला गरजेचे क्षार पाण्यातून मिळतात. शरीरात पाण्याचे प्रमाण कमी झाले की आपल्याला तहान लागल्याची जाणीव होते. तोंड, जीभ, घसा कोरडा पडतो. तरीही आपण पाणी प्यायले नाही तर शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. त्याला 'डिहायड्रेशन' म्हणतात.

२. जेवण्यापूर्वी जास्त पाणी पिऊ नये; कारण त्यामुळे भूक कमी होते. जेवताना थोडे-थोडे पाणी प्यावे आणि जेवणानंतर एक ते दीड तासाने पुरेसे पाणी प्यावे.

**प्र १. ब**

१. जेवण्यापूर्वी जास्त पाणी प्यायल्यास भूक कमी होते.

२. दिवसातून सहा ते सात पेले (ग्लास) पाणी प्यावे.

३. पाण्याला आपण जीवन म्हणतो.

४. शरीराला गरजेचे क्षार पाण्यातून मिळतात.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र २.** | १. | तीन ते चार | २. | कमी | ३. | पचन | ४. | जीवन |
| **प्र ३.** | १. | चूक | २. | चूक | ३. | बरोबर | ४. | बरोबर |
| **प्र ४.** | १. | जल | २. | आयुष्य | ३. | विद्यालय | | |
| | ४. | सरिता | ५. | मास | | | | |
| **प्र ५.** | १. | जास्त | २. | अपूर्ण | ३. | अर्वाचीन | | |
| | ४. | मरण | ५. | अपचन | | | | |
| **प्र ६.** | १. | नद्या | २. | डोळा | ३. | शाळा | | |

✦ **हसत-खेळत**

**प्र ७. घरात**

१. तोंड धुताना/ब्रश करताना नळ सतत चालू न ठेवणे.

२. अंघोळीसाठी शॉवरचा वापर न करणे.

३. पिण्याच्या पाण्याच्या फिल्टरमधून वाया जाणारे पाणी घरात इतर कामात उपयोगात आणणे.

४. नळातून टप-टप पडणारे पाणी वेळीच बंद करणे.

**शाळेत**

१. पाण्याचा वापर केल्यानंतर नळ बंद करणे.

२. नळ चालू दिसल्यास बंद करणे.

३. पाण्याचा योग्य वापर व्हावा यासाठी फलक लावणे.

## ७ पाऊस आला रे

### ✦ काव्य परिचय

- पाऊस आला आहे त्यामुळे कवी पावसाच्या धारा झेलायला बोलवत आहे.
- झाडे हिरवी झाली आहेत, ती गाणी गात आहेत, पावसाच्या पाण्यामुळे माती ओली झाल्यामुळे सर्वत्र मातीचा ओला सुगंध दरवळत आहे.
- काळ्या नौकेसारखे ढग क्षितीजावर झुलू लागले आहेत. संपूर्ण डोंगर भिजला आहे.
- कधी-कधी पाऊस येतो असे वाटते; पण पाऊस पडतच नाही. तो चकवा देतो.
- पावसात मुलांच्या गाण्याने, फुलांच्या सुवासाने सर्वत्र सुगंधी वातावरण झाले आहे.

### ✦ उद्‌देश

- पावसात होणाऱ्या बदलांचे व मुलांच्या आनंदाचे वातावरण, त्यांना मिळणारा आनंद यातून सांगणे.
- त्या निसर्गातील बदलांचे मुले किती मनमुराद आनंद घेतात हे समजावणे.
- पाऊस अचानक आल्यानंतर किंवा खूप दिवस न आल्याने काय होते हे ज्ञात करून देणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना ज्ञात असलेल्या पावसाच्या कवितांचे गायन करण्यास सांगावे.
- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना नवीन शब्दांचे अर्थ विचारत कविता समजवावी.
- विद्‌यार्थ्यांना कवितेतील पावसाचे वर्णन समजावून द्‌यावे.
- कविता संपूर्ण शिकवून झाल्यावर शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना कवितेला चाल लावून कवितेचे सामूहिक गायन करून घ्यावे.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. कवितेत पाऊस आला रे आला असे कवी म्हणत आहे.

२. पाऊस आल्यावर कवी पावसाच्या धारा झेलायला सांगत आहे.

३. कवितेतील ढग काळ्या नौकेसारखे दिसत आहे.

४. पानोपानी रुणझुण पैंजण वाजत आहे.

५. पावसात डोंगर न्हाले आहेत.

**प्र २.** १. झाडे झाली हिरवी गाणी
रुणझुण पैंजण पानोपानी
सुगंध ओला रे ओला
पाऊस आला रे आला।।

२. कधी अचानक येतो म्हणतो
येतच नाही चकवा देतो
रिमझिम झाला रे झाला
पाऊस आला रे आला।।

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. पर्जन्य | २. पर्वत | ३. मेघ | ४. सुमन | |
| **प्र ४.** | १. हिरवी | २. काळ्या | ३. सुगंध | ४. धारा | ५. पैंजण |
| **प्र ५.** | १. क्षितिज | २. पैंजण | ३. गंधासवे | ४. रिमझिम | ५. पानोपानी |

## ८ स्वामी विवेकानंद

### ✦ पाठ परिचय

- विवेकानंदांचा परिचय.
- त्यांचा स्वभाव व बालपणापासून त्यांचे छंद याची ओळख.
- विवेकानंदांनी देशातील तरुण पिढीला दिलेला संदेश.
- राष्ट्रीय युवा दिवस याविषयी माहिती.

### ✦ उद्देश

- स्वामी विवेकानंदांच्या कार्याची माहिती होणे.
- विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांना ज्ञात करून देणे.
- २१व्या शतकात त्यांच्या विचारांची किती गरज आहे हे समजावून देणे.
- स्वामी विवेकानंदांचे कार्य जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी प्रथम विद्यार्थ्यांना ज्ञात असलेल्या नेत्यांची माहिती जाणून घेणे.
- विद्यार्थी नेत्यांची नावे सांगताना त्यावेळी स्वामी विवेकानंदांचे नाव काढून घेण्याचा प्रयत्न करावा.
- विद्यार्थ्यांना ज्ञात असलेल्या त्यांच्या वाचनातील अनुभवांची वर्गात चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांना छोटे-छोटे प्रश्न व नवीन शब्दांचा अर्थ विचारत पाठ समजावून सांगावा.
- आजच्या तरुण पिढीला स्वामी विवेकानंदांच्या विचारांची किती गरज आहे हे समजावून सांगणे. आपण राष्ट्रीय युवा दिन का साजरा करतो? हे समजावून देणे.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. स्वामी विवेकानंद यांच्या आईचे नाव **भुवनेश्वरी देवी** होते व त्यांच्या वडिलांचे नाव **श्री विश्वनाथ दत्त** असे होते.

२. नरेंद्रनाथ (स्वामी विवेकानंद ) यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, पोहणे, होडी वल्हवणे, घोडेस्वारी, लाठीयुद्ध, गायन, आणि वाचन इत्यादी छंद होते.

**प्र २.** १. १२ जानेवारी, २०१३ रोजी स्वामीजींच्या जन्माला १५० वर्षे पूर्ण झाली.

२. स्वामीजींच्या **गुरूंचे** नाव **रामचंद्र परमहंस** होते.

३. स्वामीजींनी स्वत:चा जीव धोक्यात घालून टांग्याच्या चाकाखालून एका लहान मुलाचे प्राण वाचविले.

४. सन १९८४ साली भारत सरकारने स्वामीजींचा वाढदिवस हा 'राष्ट्रीय युवा दिवस' म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. | दयाळू | २. | पवित्र | ३. | वेदना | ४. | प्रेरणादायी |
| **प्र ४.** | १. | रामचंद्र परमहंस | २. | स्वामी विवेकानंद | | | ३. | स्वामी विवेकानंद |
| **प्र ५.** | १. | अनुयायी | २. | प्रेमळ | ३. | श्वान | ४. | कसरत |
| **प्र ६.** | १. | अपवित्र | २. | दिवस | ३. | अपूर्ण | | |
| | ४. | मृत्यू | ५. | आनंद/सुख | ६. | गुरू | | |

प्र ७. १. कुत्री २. घोडी ३. वडील

प्र ८. १. कुत्रे २. घोडा ३. टांगे
४. कुस्त्या ५. होड्या

## ९ आईला मदत करूया!

### ✦ पाठ परिचय

- घरातील कामे करताना सगळ्यांनी मिळून केली की आईला मदत होते. तसेच आपल्यालाही स्वत: कामे केल्याचा आनंद मिळतो.
- सुट्टीच्या दिवशी अशीच वैभवी व दादाची(चेतनची)युक्ती.
- आईला केलेली मदत.
- दोघांनी मिळून केलेले कामाचे नियोजन.
- दोघांच्या कामाचे वाटप करून ज्याला जे काम योग्यरितीने करता येईल त्याप्रमाणे काम करणे.
- दोघांनी केलेले काम बघून आईला झालेला आनंद.
- रोज आई आपल्या सगळ्यांसाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत किती काम करते याची जाणीव होणे.

### ✦ उद्देश

- छोट्या-छोट्या कामातून दुसऱ्याला मदत करण्याची भावना निर्माण होणे.
- स्वत: केलेल्या कामातून एक वेगळाच आनंद मिळतो याचे ज्ञान होणे.
- आई आपल्या प्रत्येकासाठी किती काम करते तेही अगदी न कंटाळता, प्रेमाने याचा अनुभव येणे.
- घरातल्या या छोट्या कृतीतून पुढे शाळेत, समाजात कोणत्याही जागी मनात मदतीची भावना निर्माण होणे व मदत करण्यास शिकणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षक विद्यार्थ्यांना प्रथम संवादरूपात असलेला हा पाठ प्रत्यक्ष संवादरूपाने कसा वाचावा यासाठी प्रकट वाचन करून दाखवतील.
- प्रकट वाचनातून समजलेला सारांश विद्यार्थ्यांकडून जाणून घेतील.
- त्यानंतर वर्गात दोन मुलांना/विद्यार्थ्यांना म्हणजेच एकाला वैभवीचे व एकास दादाचे जे संवाद असतील ते संवादरूपाने वाचण्यास सांगतील.
- पाठाद्वारे / पाठास अनुसरून विद्यार्थीही घरी आईला अशीच मदत करतात का?... अशा वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा करून त्यांच्या अनुभवामधून पाठ समजावून देतील.
- आपण आईला जशी मदत करतो तशीच आपण ज्यावेळी जिथे-जिथे गरज भासेल तिथे मदत करीत जावे हे समजावून देतील.
- विद्यार्थ्यांमध्ये मुल्यांची जपणूक करण्यास प्रोत्साहित करतील.

### ✦ उत्तरे

प्र १. १. आईला वैभवी व चेतनने मदत केली त्या दिवशी रविवार होता.
२. पोळ्या वैभवीने केल्या.
३. झाडू मारून केर भरून दादाने घर स्वच्छ केले.

४. या पाठातील संवाद दादा (चेतन), वैभवी व आई यांच्यात झाला.

५. वैभवी व चेतनने कांदा-बटाट्याची भाजी केली.

**प्र २** १. अरे वा! तुझी कल्पना तर फारच छान आहे.

२. अग, पण भाजी कोण करणार?

३. दादा, कढईत अगोदर तेल टाक, मग कांदे.

४. आई, बघ आम्ही काय काम केले!

**प्र ३.** १. वैभवी व दादा (चेतन) २. वैभवी

३. दादा (चेतन)

**प्र ४.** १. वैभवी दादाला (चेतनला) म्हणाली.

२. वैभवी दादाला (चेतनला) म्हणाली.

३. वैभवी आईला म्हणाली.

४. आई वैभवी आणि चेतनला म्हणाली.

**प्र ५.** १. कार्य २. सतत ३. गृह ४. विसावा ५. माता

**प्र ६.** १. दु:ख २. कमी ३. आतून ४. नंतर

**प्र ७.** १. कांदा २. बटाटे ३. भाज्या

४. पोळी ५. घर ६. सुट्ट्या

## १० झाड बोलतेय

### ✦ पाठ परिचय

- झाड हे आपल्यासारेखच सजीव आहे. आपल्यात व झाडात बरेच / खूप साम्य आहे. हे झाड स्वत: सांगत आहे.
- जसे आपल्याला वेगवेगळे अवयव आहेत त्याप्रमाणे पाठातही झाडाच्या वेगवेगळ्या अवयवांची माहिती व कार्यही दिलेले आहे.
- मनुष्याला व जीवसृष्टीला झाडांची किती गरज आहे व आपण निसर्गाची जपणूक करावी म्हणजे आपले भविष्य उज्ज्वल होईल हे या पाठातून सांगितले आहे.
- काळाची गरज म्हणून आजच आपण या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

### ✦ उद्देश

- झाड व मनुष्यजीवन यात खूप-खूप साम्य आहे हे समजणे.
- मनुष्य प्राण्याप्रमाणेच झाडाचे अवयवही झाडासाठी कार्यरत असतात हे ज्ञात होणे.
- पृथ्वीतलावर / निसर्गात होणारे बदल व वृक्षतोड यांचा संबंध समजणे.
- वृक्षसंवर्धन व त्यासाठी वेगवेगळे उपाय तसेच समाजात जागृतता निर्माण होणे.
- पृथ्वीचा / निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्त्व याचे ज्ञान होणे.

### ✦ अध्यापन कृती

- विद्यार्थ्यांना झाडांविषयी ज्ञान आहे; परंतु झाड व आपल्यातील साम्य कसे हे उदाहरण ाद्वारे पटवून द्यावे.

  उदा. डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्या यंत्राने सिद्ध झालेल्या गोष्टी वर्गात सांगाव्यात.
- आपल्यासारखे झाडाचे अवयवही काय कार्य करतात? हे विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानातून व इतर

उदाहरणे देऊन पटवून द्यावे.

- आपण आज २१ व्या शतकात आपल्या स्वार्थासाठी प्रचंड

  वृक्षतोड करतो; परंतु जपणूक किंवा वृक्षारोपण करत नाही. आपण व वृक्ष निसर्गाची लेकरे आहोत. आपल्याप्रमाणे त्याचीही काळजी घ्यावी हे समजावून सांगावे.
- विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या उपक्रमातून समाजात आपण कशी जागृती निर्माण करू शकतो हे या गोष्टीतून ज्ञात करून द्याव्यात.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. फांद्या, खोड, मुळे, पाने, फुले, फळे हे झाडाचे अवयव आहेत.

२. फुलांचे महत्त्वाचे काम म्हणजे चवदार व रसरशीत फळे तयार करणे होय.

३. पान म्हणजे झाडाचे स्वयंपाकघर.

४. वृक्ष व माणसे ही दोघेही निसर्गाची लेकरे आहेत.

**प्र २.** १. खोड २. फळे ३. आकर्षक ४. झाड

**प्र ३.** १. वेगवेगळी २. निसर्गाने ३. सूर्यप्रकाश ४. जंगलतोड

**प्र ४.** १. आंबा २. पेरू ३. फणस ४. चिकू
५. जांभूळ

**प्र ५.** १. गुलाब २. मोगरा ३. चाफा
४. झेंडू ५. जाई

**प्र ६.** १. झाडे २. फांदी ३. लेकरू
४. फळे ५. पिढ्या

**प्र ७.** १. फळे २. पाने ३. खोड
४. मुळे

## ११ सांग ना आई!

✦ **काव्य परिचय**

- कवितेतील मुलाला उत्सुकतेमुळे पडलेले प्रश्न आणि त्या प्रश्नांच्या उत्तरांची आईकडून अपेक्षा करणे.
- त्यातील प्रश्न म्हणजे

  १. दिवसभर उन्हात झाड सुकत नाही का?

  २. वारा सतत पळत असतो तरीही दमत कसा नाही?

  ३. सूर्य रात्री कुठे जातो? त्याचे घर कुठे आहे?

  ४. उजेडात दिवसा चंद्र झोपतो का? झोपेसाठी अंधार मात्र होत नाही?

  ५. दिवसभर आई तू काम करतेस तरी तू थकलेली दिसत नाही.

  ६. मला रोज बाप्पाला नमस्कार कर सांगते; पण बाप्पाचे घर मला कधी दिसत नाही.
- मुलांच्या भावविश्वाचे दर्शन यातून घडते.

✦ **उद्देश**

- लहान मुलांच्या मनात नेहमी प्रश्नांचे काहूर माजते त्या प्रश्नांचे निरसन करणे.

- मुलांच्या ज्ञानात भर पाडून त्यांची उत्सुकता वाढविणे.
- मराठी भाषेच्या ज्ञानाची भर पाडणे व नवीन-नवीन गोष्टींच्या ज्ञानातून त्यांना भाषा अवगत होणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी प्रथम विद्यार्थ्यांना विचारावे की त्यांना कोणतीही नवीन गोष्ट बघितल्यावर प्रश्न पडतात का? ते प्रश्न कोणास विचारतात? याविषयी जाणून घ्यावे.
- कवितेतील मुलाला कसे वेगवेगळे प्रश्न विचारावेसे वाटतात आणि तो ते आईला कसे विचारतो? याविषयी चर्चा करावी.
- विद्यार्थ्यांकडून कवितेचा अर्थ पुन्हा विचारून घ्यावा.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. 'सांग ना आई' या कवितेतील लहान मुलगा आईला प्रश्न विचारत आहे.
२. रात्रंदिवस पळून-पळून वारा दमत नाही.
३. दिवसभर काम करून आई थकत नाही.
४. दिवसभर उन्हात असून झाड सुकत नाही.

**प्र २.** १. सूर्य रात्री कुठे जातो सांग ना आई
त्याच घर कुठे ते दिसत नाही!
२. उजेडात दिवसा चंद्र झोपतो का आई
झोपेसाठी अंधार तर दिसत नाही!
३. बाप्पाला नमस्कार कर सांगतेस ना आई
पण मला कसा कधी तो दिसत नाही!

**प्र ३.** १. सुकत नाही. २. थकत नाही.
३. दिसत नाही. ४. दमत नाही.

**प्र ४.** १. जननी २. तरू ३. पवन ४. भास्कर
५. शशी ६. दिन ७. निद्रा ८. रजनी
९. ईश्वर १०. वंदन

## १२ एक वेगळीच युक्ती

✦ **पाठ परिचय**

- एका व्यापाऱ्याच्या घरात झालेली चोरी व चोराची ओळख कशी पटवायची याविषयी मित्राची युक्ती.
- सर्व मित्रांना व नोकरांना बोलावून त्यांना एकसारख्या / एकाच मापाच्या काठ्या देणे.
- जो चोर असेल त्याची काठी एक बोट लांब होईल व जो चोर नसेल त्याची काठी तशीच राहील असे मित्राचे नोकरांना सांगणे.
- चोराचे एक बोट काठी वाढेल या भीतीने काठी कापणे व दुसऱ्या दिवशी त्याचीच काठी सगळ्यांपेक्षा कमी असणे म्हणून तो पकडला जाणे.
- चोरी केलेले सर्व सामान परत घेऊन त्याला पोलिसांच्या ताब्यात देणे व व्यापाऱ्याच्या मित्राची युक्ती सर्वांना खूप आवडणे.

✦ **उद्देश**

- कोणत्याही परिस्थितीत युक्ती किंवा चातुर्याने कसे सामोरे जावे याचे दर्शन व त्यामुळे मिळण ाारे समाधान समजावून देणे.
- कोणत्याही परिस्थितीत चोरीचा मार्ग स्वीकारू नये ही शिकवण देणे.
- केलेले वाईट कृत्य हे उघडे होतेच; म्हणून मेहनत व सत्याचाच मार्ग स्वीकारावा असा विचार मनात रुजविणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना युक्ती आणि चातुर्याची उदाहरणे विचारून त्यानंतर पाठाच्या भावार्थाकडे न्यावे.
- विद्यार्थ्यांना अनुभवातून युक्ती/चातुर्याची गोष्ट किंवा उदाहरणे ज्ञात करून द्यावीत.
- कठीण प्रसंगात युक्तीचा कसा उपयोग होतो हे पाठाच्या आधारे समजावून द्यावे.
- मित्राने चोराला कसे चतुराईने/युक्तीने पकडले व सामान कसे परत मिळवून घेतले हे समजावून सांगावे.
- बुद्धिचातुर्याचा वापर करावा व वाईट मार्गाचा स्वीकार करू नये ही शिकवण देणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. व्यापाऱ्याने सर्व हकिकत आपल्या एका समजूतदार मित्राला सांगितली.

२. व्यापाऱ्याच्या मित्राने सर्व मित्रांना व नोकरांना एक-एक काठी दिली.

३. एका बोटाएवढी काठी चोरी करणाऱ्या चोराने कापली.

४. चोराला पोलिसांच्या ताब्यात दिले.

**प्र २.** १. काठी  २. एक बोट  ३. घरी
४. चोर  ५. पोलिसांच्या

**प्र ३.** १. सखा  २. चाकर  ३. दंड
४. हुशार  ५. कौतुक

**प्र ४.** १. अनेक  २. अविचार  ३. शत्रू
४. कमी  ५. संध्याकाळी

**प्र ५.** १. विद्यार्थी  २. घर  ३. देव
४. मेथी  ५. नदी

**प्र ६.** विद्यार्थी दिलेले शब्द बघून त्या शब्दांचे अचूक लेखन करतील.

**प्र ७.**

| **प्राणी** | **पक्षी** | **मित्र** |
|---|---|---|
| **म**- माकड | मोर | विद्यार्थी मित्रांची नावे स्वतः लिहितील. |
| **क**-कासव | कावळा | |
| **स**-ससा | सुतारपक्षी | |
| **ह**-हत्ती | हंस | |
| **च**-चित्ता | चिमणी | |
| **ग**-गाढव | गरुड | |
| **प**-पाणमांजर | पोपट | |
| **व**-वाघ | वटवाघूळ | |

✦ **हसत-खेळत**

**प्र ८. बैठी खो-खो**

खो-खो हा एक भारतीय मैदानी खेळ असून ह्या खेळासाठी मैदानाच्या दोन टोकांना रोवलेल्या खांबांची आवश्यकता असते. हा खेळ खेळण्यासाठी अतिशय सोपा व लोकप्रियही आहे. तरीही हा खेळ गतिमान असल्यामुळे ह्या खेळात चपळतेचा, गतीचा कस लागतो व हा खेळ उत्कंठावर्धक होतो.

खो-खो मध्ये दोन संघ असतात. प्रत्येक संघात १२ खेळाडू असतात; परंतु एका वेळेस ९ खेळाडू खेळतात. खेळ दोन भागामध्ये विभागला जातो. दोन भागांमध्ये ५ मिनिटे विश्रांतीचा कालावधी असतो. प्रत्येक भागात पुन्हा दोन उपभाग असतात. त्यातील पहिल्या उपभागात पहिला संघ दुसऱ्या संघाचा पाठलाग करतो आणि दुसरा संघ बचाव करतो. दुसऱ्या उपभागामध्येही २ मिनिटे विश्रांतीचा कालावधी असतो. साधारण हा खेळ ३७ मिनिटे असतो.

## १३ गुढीपाडवा

✦ **पाठ परिचय**

- परंपरेने साजऱ्या होणाऱ्या सणांचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना या पाठातून होईल.
- नवीन वर्ष म्हणजे 'गुढीपाडवा' या सणाचे पौराणिक महत्त्व व हा सण वेगवेगळ्या नावांनी कसा ओळखला जातो? याची माहिती.
- गुढीपाडवा कसा साजरा करतात? याचे वर्णन
- मराठी भाषा व संस्कृतीची ओळख.

✦ **उद्देश**

- सणांची सखोल माहिती होणे.
- सण साजरे करण्यामागील उद्देश ज्ञात होणे.
- एकात्मतेची भावना निर्माण होणे.
- आपल्या संस्कृतीची जपणूक करणे.
- निसर्गातील बदलांचे ज्ञान होणे.

✦ **अध्यापन कृती**

- पूर्वज्ञानातून गुढीपाडवा कसा साजरा करतात? हे जाणून घ्यावे.
- चैत्र महिन्याचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा. यादिवशी नवीन युगाचा प्रारंभ कसा झाला? हे समजावून देणे.
- यादिवशी आपण काय-काय करतो? हा सण म्हणजे निसर्गाच्या बदलांचा मंगल सण कसा? असे प्रश्न विचारून ज्ञात माहिती विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावी. पाठ सविस्तररित्या समजावून द्यावा.
- गुढीपाडवा वेगवेगळ्या ठिकाणी कोणकोणत्या नावाने ओळखला जातो? हे ज्ञात करून द्यावे.
- सण साजरे करण्यामागची पौराणिकता समजावून सांगावी.
- हा सण साजरा करण्यामागचा उद्देश व मराठी भाषेविषयीची आत्मीयता समजावून देणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. चैत्र शुद्ध प्रतिपदेला 'गुढीपाडवा' हा सण साजरा करतात. ब्रह्मदेवाने या दिवशी नवीन युगाचा प्रारंभ केला; म्हणून याला 'युगादी' म्हणतात. कर्नाटकात या सणाला

'उगादी' म्हणतात. शीतलशीमगा, वर्षारंभ सिंहावलोकन दिन, संकल्प दिन, सदिच्छा दिन व संवत्सदिन इत्यादी नावांनी हा सण ओळखला जातो.

२. गुढीपाडवा या दिवशी गुढी उभारून, तोरण बांधून मोठ्या आनंदाने हा निसर्गाचा उत्सव साजरा केला जातो. गुढी उभारताना एका मोठ्या काठीच्या टोकावर रेशमी कापड गुंडाळून त्यावर चांदीचा गडू ठेवून नंतर त्याला बत्ताशाची व फुलांची माळ बांधून ही गुढी स्वच्छ केलेल्या अंगणात उभारली जाते. नंतर कडुलिंबाचा पाला, खोबरे, साखरेच्या गाठी याचा प्रसाद वाटायचा असतो. या दिवशी जेवणातही पुरणपोळी किंवा इतर गोड पक्वान्न केली जातात, एकमेकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतात.

**प्र २.** १. ब्रह्मदेवाने या दिवशी नवीन युगाचा प्रारंभ केला म्हणून गुढीपाडव्याला 'युगादी' असेही म्हणतात.

२. पाडवा म्हणजे निसर्गाच्या बदलांचा मंगल सण असतो.

३. सूर्योदयाच्या वेळी विश्वनिर्मिती करून ब्रह्मदेवाने कालगणना सुरू केली.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्र ३.** | १. चैत्र पाडवा | २. निसर्गाच्या | ३. उगादी |
| **प्र ४.** | १. नूतन | २. सुरुवात | ३. साल |
| | ४. उत्सव | ५. शुभ | |
| **प्र ५.** | १. शेवट | २. रात्र | ३. कडू |
| | ४. जुने | ५. वाईट | |
| **प्र ६.** | १. गुढ्या | २. काठ्या | ३. महिने |
| | ४. पुरणपोळ्या | ५. पीक | ६. फूल |

## १४ मौन

✦ **काव्य परिचय**

- या कवितेत झाडाचे मौन का असते? हे सांगितले आहे.
- थकलेल्या (शिणलेल्या) झाडापाशी कोकिळा गाणं गाऊ का? विचारते; पण झाड बोलत नाही म्हणून ती उडून जाते.
- सुगरण येते घरटं बांधू का? विचारते; पण झाड बोलत नाही म्हणून ती निघून गेली.
- चंद्रकोर आली व म्हणाली, "जाळीत लपू का?" तरीही झाड बोलत नाही म्हणून चंद्रकोर मार्गस्थ होते.
- शेवटी बिजली आली व मिठीत येऊ का? असे विचारते तेव्हा झाडाचे मौन सुटते व त्याच्या अंगाअंगातून होकाराचं तुफान उठते.

✦ **उद्देश**

- मौन म्हणजे काय? व झाडाने धारण केलेले मौन याविषयी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळणे.
- विद्यार्थ्यांना पाठांतराची सवय होणे.
- कवितेमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण होणे.
- कुसुमाग्रजांच्या कवितेद्वारे भाषेचे/भाषेविषयी प्रेम निर्माण करणे.
- वेगवेगळ्या शब्दसौंदर्यामुळे भाषेवरील प्रेम वाढवणे. त्यामुळे भाषेचे सौंदर्य कवितेतून अनुभवणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी प्रथम मौन म्हणजे काय? हे समजावून सांगावे. मौन व्रतामुळे काय फायदे होतात? ते सांगावे.
- झाड थकल्यामुळे ते मौन धारण करते. त्यामुळे कोण-कोण परत जाते? व त्याचे मौन कोणामुळे सुटते? हे कवितेतून समजावून द्यावे.
- संपूर्ण कवितेचा अर्थ विद्यार्थ्यांना समजला आहे की नाही हे कवितेवर छोटे-छोटे प्रश्न विचारून पडताळून घ्यावे.
- कवितेला चाल लावून विद्यार्थ्यांकडून कविता ताला-सुरात म्हणवून घ्यावी.
- कवितेखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. थकलेल्या, शिणलेल्या झाडापाशी कोकिळा, सुगरण, चंद्रकोर व बिजली(वीज) आली.

२. कवितेत कोकिळा व सुगरण या दोन पक्ष्यांची नावे आलेली आहेत. कोकिळा झाडाला म्हणाली, "गाणं गाऊ का?" तर सुगरण झाडाला म्हणाली, "घरटं बांधू का?"

**प्र २.** १. शिणलेल्या झाडापाशी सर्वप्रथम कोकिळा आली.

२. शिणलेल्या झाडास चंद्रकोर म्हणाली, "जाळीत लपू कां?"

३. बिजलीने झाडाचे मौन तोडले.

**प्र ३.** १. सुगरण आली
म्हणाली, घरटं बांधू का?

२. झाडाच मौन सुटलं
अंगाअंगातून होकारच तुफान उठलं?

**प्र ४.** १. झाड २. उडून गेली
३. घरटं बांधू का? ४. मार्गस्थ झाली
५. मौन सुटलं

**प्र ५.** १. खग २. गीत ३. वृक्ष ४. अबोला ५. वादळ

**प्र ६.** १. पक्षी २. झाडे ३. घरटी ४. मिठ्या

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** विद्यार्थी आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार उत्तरे सांगतील.

## १५ छत्रपती शिवाजी महाराज

✦ **पाठ परिचय**

**शिवाजी महाराजांचा परिचय**

- जन्म, त्यांचे नाव, संस्कार, बालपण याविषयी सखोल ज्ञान.
- बालपणी मिळालेले शिक्षण, सवंगड्यांच्या मदतीने त्यांनी मोगलांच्या ताब्यातील अनेक किल्ले जिंकले यातून शिवरायांच्या पराक्रमाची ओळख.
- शिवरायांना साधुसंतांबद्दलचा असलेला आदर, त्यांचे गुरू, व्यक्तिमत्त्वाचे तेजस्वी पैलू यांची ओळख.
- हिंदवी स्वराज्याची केलेली स्थापना, शिवरायांच्या वेगवेगळ्या नावांची ओळख.

- शिवरायांचा जन्मदिवस शिवजयंती म्हणून साजरा करणे व त्यांच्या कारकीर्दीला शिवकाल म्हणण्यामागचे कारण याविषयीची विद्यार्थ्यांना सखोल माहिती करून देणे.

✦ **उद्‌देश**

- शिवाजी महाराजांविषयी सखोल ज्ञान प्राप्त होणे.
- शिवाजींची शूरता, कारकीर्द, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तेजस्वी पैलू ज्ञात होणे.
- ऐतिहासिक गोष्टींविषयी विद्‌यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण होणे.
- शिवरायांच्या विचारांचा, शूरतेचा वारसा जपणे व परंपरेने पुढे नेणे याचे ज्ञान होणे.
- शिवरायांचे कार्य सखोलपणे ज्ञात करून देणे व मराठी भाषेविषयीचे प्रेम वाढविणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांच्या पूर्वज्ञानातून प्रथम शिवाजी महाराजांच्या कार्याविषयींची त्यांना ज्ञात असलेली माहिती जाणून घ्यावी.
- पाठाचे प्रकट वाचन करून नंतर पाठातील मुद्‌द्यांचे वेगवेगळ्या उदाहरणाद्‌वारे स्पष्टीकरण करून द्‌यावे.
- शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते त्यांचे नाव, संस्कार, बालपण व त्यांची कारकीर्द याविषयी माहिती पाठाद्‌वारे समजावून सांगावी.
- शिवाजी महाराजांच्या संस्कारांचे, शौर्यतेचे व त्यांनी शौर्याने जिंकलेल्या किल्ल्यांचे आपण कसे जतन करावे हे समजावून द्‌यावे.
- शिवरायांचा अनमोल वारसा जतन करावा याविषयी नवीन यंत्रणेद्‌वारे कशाप्रकारे योजना कराव्यात याची माहिती करून द्‌यावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. शिवाजी महाराजांचे नाव **शिवाई** देवीच्या नावावरून ठेवले.

२. शिवाजी महाराजांच्या आईचे नाव **जिजाबाई** व वडिलांचे नाव **शहाजीराजे** होते.

३. **दादाजी कोंडदेव** यांनी शिवाजी महाराजांना लढाईचे प्रशिक्षण दिले.

४. **समर्थ रामदास** हे शिवरायांचे गुरू होते.

५. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस **शिवजयंती** या नावाने साजरा करतात.

६. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीला **शिवकाल** असे म्हणतात.

**प्र २.** १. दादाजी कोंडदेव यांनी शिवाजी महाराजांना लढाईचे सर्व प्रकारचे शिक्षण दिले. त्यात त्यांनी तलवारबाजी, भाला फेकणे, तिरबाजी, पट्‌टा फिरविणे, कुस्ती खेळणे या सर्व प्रकारच्या लढाईच्या प्रशिक्षणात तरबेज केले. शिवरायांच्या समोर दादाजी कोंडदेव न्यायनिवाडा करत असत. त्यामुळे न्यायदान करण्याचे प्रशिक्षणही त्यांना मिळाले.

२. महाराष्ट्रात शिवाजी महाराज यांना शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिव, शिवराय, शिवा इत्यादी नावांनी ओळखले जाते.

**प्र ३.** १. दादाजी कोंडदेव २. जिजाबाई

३. शिवाजी महाराज ४. समर्थ रामदास

**प्र ४.** १. शिवनेरी २. पित्याचा ३. संस्कार

४. आदर ५. सर्वगुणसंपन्न

**प्र ५.** १. गोष्ट २. सैन्य ३. वचन ४. नरेश

५. सन्मान

**प्र ६.** १. लहान २. शिष्य ३. एक ४. बेसावध
५. रंक ६. अनादर

**प्र ७.** १. भाले २. तलवार ३. लढाया
४. मावळे ५. किल्ला

✦ **हसत-खेळत**

**प्र ८.** विद्यार्थी त्यांना माहीत असलेला प्रसंग लिहितील.

**प्र ९.** १. सुभाषचंद्र बोस २. पंडित जवाहरलाल नेहरू
३. स्वामी विवेकानंद ४. महात्मा ज्योतीराव फुले
५. स्वातंत्र्यवीर सावरकर ६. शिवाजी महाराज
७. लोकमान्य टिळक ८. भगतसिंग